REVIEW OF RESEARCH


IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# छत्रपती शिवाजीचे मोगल संबंध

डॉ. देसले विजय कौतीकराव
श्रीमती वि. उ. पाटील कला व
कै. डॉ. बी.एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री (धुळे)

## प्रस्तावणा :-



आज इतिहासकारांमध्ये व समाजामध्ये छत्रपती शिवाजी राजांविषयी फक्त महाहराष्ट्राचा राज्यकर्ता मराठा राज्याचा राजा अशी प्रतिमा होत चाललेली आहे. आपण ऐतिहासिक साधनांची उपलब्धता करुन शिवाजीचे राज्य हे महाराष्ट्रा पुरते मर्यादीत नसुन ते संपुर्ण हिंदुस्थानात हिंदवी राज्य निर्मीतीच्या उद्देशाने होते हे स्पष्ट होते. त्यांनी अनेक लढाया जींकल्याअसतील तरी त्यांच्या लढयापेक्षा त्यांची मोगल, अदिलशाही, निजामशाही यांच्या बरोबर जी धोरणे होती त्यात त्यांचे खरे अधिराज्य दडलेले आहे. थोडक्यात अफजल खान वध, शाहीस्तेखान प्रकरण या घटनांपेक्षा त्यांनी आग्रा भेटीच्या वेळी जो आपला बाणा दाखविला त्यातुनच खऱ्या अर्थाने उत्तर भारतात नवचैतन्य निर्माण होवून मोगलांविरोधात अनेक राज्यकर्ते हिंदवी स्वराज्यासाठी लढू लागले. त्याचे एक उदाहरण म्हणजे छत्रलाल बुंदेल होय. शिवाजीचे राज्य हे मराठयांचे राज्य नसुन ते हिंदवी स्वराज्य होते ते सबंध हिंदुस्तानासाठी प्रेरणादायी स्वराज्य होते. थोडक्यात उत्तरेकडील छत्रसालाने जिंकलेला उत्तर प्रदेश (बुंदेलखंड) मध्यप्रदेश (माळवा) ही छत्रपतीची प्रेरणा होती. स्वतः छत्रपतींनी जिंजीपर्यंत चाल करुन दक्षिण भारत जिंकला होता ही मराठी राज्याची निर्मीती नाहीतर उत्तर भारतीयांप्रमाणे समतुल्य राज्य निर्माण करण्याचा अंतर्भाग होता. म्हणुन मी माझ्या शोध निबंधात छत्रपती शिवाजीचे उत्तरेकडील धोरणावर प्रकाश टाकत आहे.

## उत्तरेकडील धोरण :-

शिवाजीचा मोगलांशी प्रथम संबंध शहाजी राजांना अटक झाल्यापासुन येतो. विजापूर दरबार आपले म्हणणे ऐकत नाही हे समजताच शिवाजीने मोगलांचे दडपण आणून आपल्या वडीलांची सुटका करणेचे हेतुने शहजादा मुराद बक्षी याचेशी बोलणी करुन आपल्या वडीलांची सुटका करुन घ्यावी या उद्देशाने पत्र व्यवहार केला. शहजाद मुरादने शिवाजीस आपला वकील आमचे कडे पाठवा असे पत्रातुन नमुद केले व त्या अनुशंगाने शिवाजीने रघुनाथ पंत कोरडे यास आपला वकील म्हणुन दिल्लीस पाठविले.[१] शिवाजी मोगलांशी मैत्रीचे संबंध निर्माण करुन अदिलशहाशी संघर्ष करेन ही भिती निर्माण झाल्यामुळे अदिलशहाने शहाजीची सुटका १६/५/१६४९ रोजी केली.

तदनंतर ३/११/१६४९ ची शाहजादा चे पत्र शहाजीस आले की तुमची मोकळी करण्याविषयी शिवाजीने लिहीले आहे हल्ली आम्ही दिल्ली कडेस जात आहो हुजूर पावल्यावर तुमचे विषयी अर्ज करुन बंदोबस्त करुन देऊ. तुमचा हितबारी वकील पाठवावा.[२] ही घटना झाल्यानंतर शिवाजी मोगल सबंध थेट १६५७ रोजी झाला तो शिवाजीचा मोगलांशी पहिला संघर्ष होता, त्यात शिवाजीने जुन्नर व अहमदनगर छापा घालणे होय. या छाप्यात मराठयांनी ११ हजार होन, २०० घोडे, जवाहिर, कापड, वगैरे पुष्कळ सामान लुटून नेले.[३] ही लुट झाल्यामुळे औरंगजेब संतापला व त्याने आपल्या फौजा शिवाजीच्या प्रदेशात पाठविल्या नासिरीखानास तसा आदेश केला. परंतु पावसाळा जवळ आल्यामुळे शिवाजीचा बंदोबस्त करणे नासिरीखानास कठीण होते. तेव्हा सन १६५७ च्या सप्टेंबरास मोगलांचा व विजापुरकरांचा तह झाला म्हणुन आपणही मोघलांशी नमते घ्यावे या दृष्टीने शिवाजीने रघुनाथपंत यास नासिरीखानाकडे व कृष्णाजी भास्कर यास औरंगजेबाकडे पाठविले त्याच काळात औरंगजेबाला दिल्लीत जाण्याच्या धांदळीमुळे त्या विषयी बोलणी झाली नाही.

उत्तरेत जात असतांना औरंगजेबाने आदिलशहास पत्र लिहून शिवाजीस डोंगरी भागात ठेऊ नये असे सुचविले. होत असेल तर त्यास कर्नाटकात पाठवा असा सल्ला औरंगजेबाने पत्राद्वारे दिला. तसेच कित्येक मराठा सरदारांना तो उत्तरेला जातांना सोबत घेऊन गेला यावरुन औरंगजेब दक्षिणेला कोणताही गोंधळ होऊ नये याची काळजी घेत होता. मात्र शिवाजी आपले स्वराज्य वाढविण्यासाठी नवनवीन योजना

आखुन विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही व मोगल यांच्यातल्या आपआपसातल्या वैमनस्याचा फायदा घेऊन राज्य वाढवणे हे ठरवुन चुकला होता. औरंगजेब उत्तर भारतात गेला व शहाजानला आग्रा येथे बंदीस्त केले तरीही शहाजान बंडाळी करेल व आपल्या हितचिंतकांमार्फत आपल्याला नेस्तनाबुत करेल ही भावना औरंगजेबाच्या मनात होती म्हणून तो अस्वस्थ होता. या अस्वस्थतेच्या काळात दक्षिणेला साम्राज्य विस्तार करणे शिवाजीला पोषक होते म्हणून सन १६६६ पर्यंत म्हणजे शहाजांच्या मृत्युपर्यंत मोगली प्रदेश ताब्यात घेणे शिवाजीचे लक्ष होते.

दिल्लीस जातांना औरंगजेबाने आपला वडिल मुलगा मुअज्जम यास मागे कारभारावर ठेविले होते (१६५८) तत्पुर्वी औरंगजेबाने रायबागन हीस दक्षिणेची जबाबदारी दिली होती तीचे घराने दक्षिणेतील उदय रायजी हा दिल्ली दरबाराशी प्रामाणिक होता. त्याने अकबराच्या काळातच आपल्या निष्ठा दर्शविल्या होत्या त्यानंतर हे घराणे तसेच मोगल दरबाराशी प्रामाणिक राहीले. औरंगजेबाच्या काळात सन १६३७ मध्ये जगजीवन यास देशमुखीची सनद मिळाली त्याच्या नावाने औरंगजेबाने जगजीवनपूरा नावाचे शहर बसविले आजही ते अस्तीत्वात आहे. त्याच्या मृत्युनंतर त्याची पत्नी राजव्याघ्री (राम बागन) असा किताब मिळाला. तीने सन १६६० मध्ये शिवाजींचे कारतल्बखानाशी उंबरखिडीत युध्द झाले त्यात या राज्यव्याघ्रीने मोगलांचा बचाव केला. या विजयानंतर शिवाजीने आपला सर सेनापती नेताजी पालकद यास मोगलांवर नजर ठेवण्यास सांगीतले त्या काळात शिवाजीने तळ कोकण जींकुन घेतला.[४] राज्यारुढ झाल्यावर त्याने शाहिस्तेखानाची नेमणुक इकडे केली (१६५९) कारतल्वखानाचा पाडाव झाल्यावर शाहिस्ताखानने दुसरी मोठी फौज मे १६६१ पाठवून कल्याण व तद्नंतर प्रदेश काबीज केला. म्हणून शिवाजीने नेताजी पालकर यास मोगलांच्या मुलखात स्वारी करुन लुट मिळविण्यास सांगीतले नेताजीने मोगल प्रदेश लुटून टाकला त्या दरम्यान रात्रीशापा घालुन शिवाजीने शाहिस्ताखानास पुण्यामधून पळवुन लावला.[५] पुढे शिवाजीने खानाची दुर्दशा केल्यावर ता. १३ मे १६६३ रोजी औरंगजेबाने त्यास बंगालात बदलून पुन्हा आपल्या मुलास दक्षिणच्या कारभारावर पाठविले आणि त्याच्या मदतीस सन १६६४ ते महाबतखानची नेमणुक केली. नंतर सन १६६५ ते जयसिंहाची नेमणुक झाली तेंव्हा मुअज्जम परत गेला. विजापूरकरांकडून जयसिंहाचा पराभव झाल्यावर पुन्हा शहाजाद्याची नेमणुक ता. ०३ मार्च १९६७ रोजी झाली त्याच्या जोडीस जयसिंह व दिलेरखान दिलेले होते. ता. १९ जुलै १६६७ रोजी मिर्झाराजे जयसिंग हे बऱ्हाणपूर येथे मरण पावला. त्यावेळी दिलेरखान समवेत औरंगजेबाने छत्रसाल बुंदेलास दक्षिणीस पाठविले होते.

आदिलशाही आणि मोगलशाही हे दोन्ही नव्या मराठी राज्यांचे शत्रु पण त्या पैकी आदिलशाही जवळची लांब उत्तरेकडून येऊन दक्षिणच्या राजकारणात हात घालू पहाणारे मोगल त्या मार्गाने शिवाजी राज्यांना अगदी अप्रीय वाटत. शिवाय आदिलशाहीने कधीच दिला नव्हता इतका त्रास त्यांना शाहिस्तेखानाने खुद्द पुण्यात मुक्काम करुन दिला होता. त्यामुळे त्यांच्यावर आपण धाडसाने छापा घालून तशी त्याला दहशत बसविली आणि औरंगाबादचा सुभा गदागदा हलविला. तसाच काही अदभूत प्रकार करुन खुद्द दिल्लीचे तक्त आणि मोगलांचे साम्राज्य गदागदा हलवावे असे महाराजांनी मनात आणले.[६]

या सुरतेच्या लुटीमुळे औरंगजेब अतिशय संतापला व त्याने मिर्झाराजे जयसिंगाची दक्षिणेचा सुभेदार म्हणुन नियुक्त केले. मिझ ाराज्यांबरोबर दिलेरखान यास पाठविले औरंगजेबाच्या एका संदर्भ ग्रंथानुसार छत्रसाल बुंदेल या पुस्तकात उल्लेख झालेला आहे. छत्रसाल हा मोगलांपासून दुःखी झालेला होता म्हणून तो मोगलांपासुन लांब जाण्याचा विचार करत होता. "छत्रसालके हृदय मे पिता मृत्युके प्रतिशोध की अग्नी भी अभि थंडी न पडी थी। इधर शिवाजीकी मोगलोंके विरुध्द अभूतपुर्व सफलताओंसे उत्तरीय भारत तक के हिंदु अनुप्राणीत हो उठे थे। छत्रसालकी उनके व्यक्तीत्व से प्रभावीत और आकर्षित हूऐ बिना नही रह सके। मुगलोंकी और से शिवाजी के विरुध्द युध्द करना उन्हे लज्जाजनक जानपडा और महाराष्ट्रमे शिवाजीके उच्च उद्देशो के लिए अपना रक्त बहाना उन्हे मुगलोंके आदेश पर अपनी तलवार हिंदु रक्त से रंजित करने की अपेक्षासे कही अधिक उचित एवं सन्मानीय प्रतित हुआ। इसलिए एक दिन शिकारपर जाने का बहाना करके छत्रसाल बुंदेल मुगलसेनासे निकल भागे और पत्नीसहीत शिवाजीसे भेट करने दक्षिण की और चलपडे जंगली तथा पहाडी दुर्गम मार्गोसे होते हुए. वे भिमा नदीतक आ पहुंचे और उसे पार कर उन्होने शिवाजीसे भेट की,

छत्रसाल बुंदेल महाराष्ट्रात महारांजाबरोबर काही युध्दात बरोबर होते. महाराजांचे युध्द तंत्र त्यांनी जाणुन घेतले त्यामुळे भविष्यात त्यांना उत्तर भारतात म्हणजे आजचा उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, यात स्वतंत्र सत्ता शिवाजींच्या प्रेरणेने निर्माण करता आली. ही संकल्पना शिवाजींची हिंदवी स्वराज्याची नांदी होती हे म्हणण्यास काहीही वावगे ठरत नाही.

"छत्रसाल कुछ समय तक शिवाजी के पास पुना मे रहे। इस समय ने उन्होंने शिवाजीके युध्द कौशल्य उनकी कुटनिती और शासन संघटनके संपर्क मे वह सारी प्रारंभी जानकारी प्राप्त कर ली जिसका उपयोग बादमे उन्हे बुंदेल खंडमे किया।[७]

ही माहिती छत्रसाल बुंदेलांनी शिवाजीजवळून आपण काय शिकलो शिवाजींचा हिंदवी स्वराजाचा उद्देश कोणता आहे. हे सांगतांना आपला सहकारी जगतराम याला लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केला आहे. त्यातच शिवाजींने छत्रसालास महाराष्ट्रात थांबु नको व बुंदेल खंडात जाऊन तुझे राज्य स्वतंत्ररित्या निर्माण कर तेव्हां हिंदवी स्वराज्य वाढेल ही भावना व्यक्त केली. "इसलिए उन्होने छत्रसालको बुंदेल खंड लोटकर मुगलों के विरुध्द स्वतंत्रता संग्राम संघठित कर स्वयंम उसका नेतृत्व करनेकी मंत्रणा दी।[८]

## निष्कर्ष :-

शिवाजींचे हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार करीत असतांना ते फक्त पुणे, सुपे, इंदापूर तसेच फक्त महाराष्ट्र असा उद्देश नसुन संपुर्ण हिंदुस्थानात हिंदु राज्याची स्थापना व्हावी हा प्रमुख हेतु होता. त्यांची जुन्नर, नगर, सुरत, तसेच उत्तरेकडील ज्या काही लढाया होत्या त्यापुर्ण त्यांची उत्तरेकडील मोगलांना शह देण्याच्या धोरणाची प्रचिती देतात. छत्रसाल बुंदेलांना केलेले मार्गदर्शन हे सुध्दा मोगलांच्या विरोधात स्वतंत्र हिंदवी राज्य निर्माण करण्याच्या उद्देशाने होते म्हणून या माझ्या शोध निबंधातुन मी शिवाजींचे मोगल संबंध समतुल्य होण्याचे होते असे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## संदर्भ ग्रंथ :-


१) सरदेसाई गो.स. :- मराठी रियासत खंड १ ला पृष्ठ १७२.
२) सरदेसाई गो.स. :- मराठी रियासत खंड १ ला पृष्ठ १०३.
३) श्री. शिवप्रभुंचे चरित्र :- पृ. ६ शिवचरित्र प्रदपि (जेधे शकावली) पृ. १८.
४) सरदेसाई गो.स. :- मराठी रियासत खंड १ पृष्ठ २०५.
५) सरदेसाई गो.स. :- मराठी रियासत खंड १ पृष्ठ २११.
६) काळे दि.वी. :- छत्रपती शिवाजी महाराज. पृष्ठ ११०.
७) डॉ. गुप्त भगवानदास :- महाराजा छत्रसाल बुंदेल. पृष्ठ २०.
८) छत्रसाल :- पृष्ठ क्र. ७९, ८०.


LBP PUBLICATION